लोकमत

# शिबिरात ८०० जणांची तपासणी

**नवे पारगाव :** अशोकराव माने आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्यावतीने पाडळी, अंबपवाडी, कासारवाडी या गावांत मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ८०० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

रक्तदाब, मधुमेह, अस्थिरोग, आम्लपित्त, त्वचारोग, दमा, मूळव्याध, भगंदर, मुतखडा आदींसह स्त्री रोग, लहान मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. पाडळी येथे सरपंच डॉ. विभा पाटील यांच्या हस्ते व जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी माजी सरपंच प्रकाश



पाडळी येथे अशोकराव माने आयुर्वेदिक हॉस्पिटलच्यावतीने आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन सरपंच डॉ. विभा पाटील यांच्या हस्ते झाले.

पाटील, रवींद्र पाटील, व्ही. बी. पाटील, धनाजी देसाई, अजित पाटील, श्रीधर पाटील, उदय पाटील, दिनकर पाटील, नितीन पाटील, महंमद पठाण, पद्मा पाटील उपस्थित होते.

अंबपवाडी येथे सरपंच पार्वती नाईक, कासारवाडी येथे शोभाताई खोत यांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उद्घाटन झाले.

डॉ. गिरीश कुमार, डॉ. सत्यजित माने, डॉ. प्रियांका माने यांनी रुग्णांची तपासणी केली.

पुढारी

# पेठवडगावच्या माने फार्मसीच्या अकरा विद्यार्थ्यांचे जीपॅट परीक्षेत उज्ज्वल यश

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या जीपॅट परीक्षेत येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या अकरा विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले. शिवाजी विद्यापीठअंतर्गत येणाऱ्या फार्मसी कॉलेजमध्ये उच्च गुणवत्ता राखत लक्षवेधी यश मिळविण्याचा मान या कॉलेजने पटकावला आहे.

औषध निर्माणशास्त्र क्षेत्रात देश पातळीवर या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या फारच कमी असते. अशा परिस्थितीत माने फार्मसी कॉलेजने मात्र दर्जेदार व गुणवत्तेच्या जोरावर अत्युच्च यशाला गवसणी घातली आहे. तब्बल अकरा विद्यार्थी सर्वोत्तम गुणांनी उत्तीर्ण होणारे हे अपवादात्मक कॉलेज ठरले आहे.

विद्यार्थ्यांच्यासर्वांगीणप्रगतीसाठी कॉलेजच्या वतीने अद्ययावत शिक्षण देण्याची व्यवस्था कायमच करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, कठोर परिश्रम व त्यांना मिळालेले योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाले आहे. यापुढेही गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबवून गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची महिती संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये निखिल माने, राजेंद्र मालेगावे, ऋतुजा बुगड, कोमल पवार, व्यंकटेश मुंडे, प्रदीप गावेकर, विजया गोवंदे, प्रेरणा तेली, श्रुती कुलकर्णी, जस्मिन नायकवडी, शुभांगी चौगुले तसेच सावे येथील अशोकराव माने इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च कॉलेजचा विद्यार्थी कौस्तुभ सुतार यांचा समावेश आहे.

या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थाध्यक्ष विजयसिंह माने प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. ए. एस. कुलकर्णी, डॉ. एस. एम. गेंजगे, प्रा. पी. बी. पाटील, प्रा. एस. ए. बंडगर उपस्थित होते



**पेठवडगाव : येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. एस. व्ही. पाटील, ए. एस. कुलकर्णी, पी. बी. पाटील, एस. ए. बंडगर उपस्थित होते.**

खेळते भांडवल २४५... ...गरिकांची लोकसंख्या

तरुणभारत



टोप : जीपॅट २०२१ परीक्षेत यशस्वीतांसमवेत संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने, प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. ए. एस. कुलकर्णी, स. प्रा. एस. ए. बंडगर, प्रा. पी. बी. पाटील.

# माने फार्मसी कॉलेजचे जीपॅट परीक्षेत यश

वार्ताहर

टोप

पेठवडगाव येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या ११ विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्यावतीने घेतलेल्या जीपॅट परीक्षेत यश संपादन केले. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे कॉलेजच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांची नावे – निखिल माने (२५२), आदर्श मालगावे (२१९), ऋतुजा बुगड (२११), कोमल पवार (२०१), वेंकटेश मुंडे (१९१), प्रदीप गावकर (१७६), विजया गोवंडे (१७०), प्रेरणा तेली (१६०), श्रुती कुलकर्णी (१६०), जस्मिन नायकवडी (१५७), शुभांगी चौगुले (१३६), कौस्तुभ सुतार (१६४).

संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अद्यावत व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी अग्रेसर आहे. विद्यार्थ्यांनी जिद्द, कठोर परिश्रमातून मिळविलेले यश हे कौतुकास्पद आहे.

यशस्वीतांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. ए. एस. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. जीपॅट विभाग प्रमुख डॉ. एस. एम. गेजगे, स. प्रा. पी. बी. पाटील, जिल्हा परिषद सदस्या मनिषा माने यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ


# अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या जागा घटल्या

**युवराज पाटील :** सकाळ वृत्तसेवा

> **बृहत् आराखड्याचे पालन नाही. सोयीनुसार निर्णय व व्यवस्थेतील व्यवस्थापनाचा अभाव यामुळे तंत्रशिक्षणाचा दर्जा ढासळला आहे. परिणामी, मागणी असूनही उच्च दर्जाचे अभियंते भेटत नाहीत. त्यामुळे हमखास नोकरी मिळत नसल्याचे कारण देत विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीकडे पाठ फिरवली आहे.**
> **- प्रा. हणमंत शेटे,** सहायक प्राध्यापक, अशोकराव माने अभियांत्रिकी महाविद्यालय

शिरोली पुलाची, ता. २८ : अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊनही बेरोजगारीचा सामना करावा लागत असल्याने गेल्या काही वर्षांत अभियांत्रिकी शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविल्याचे चित्र आहे. यामुळे गेल्या पाच वर्षांत देशातील अभियांत्रिकीच्या साडेसहा लाखांवर जागा घटल्याची माहिती समोर आली आहे.

पंधरा ते वीस वर्षांपूर्वी अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेण्याची स्पर्धा लागली होती. नोकरीची हमी आणि अभियंत्यांना असलेली प्रतिष्ठा पाहून अनेक विद्यार्थी या अभ्यासक्रमाकडे वळायचे. यामुळे महाविद्यालयांची संख्या वाढली. स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होऊनही तेथे प्रवेशासाठी रांगा लागायच्या. मात्र, पाच वर्षांत अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊनही अनेक विद्यार्थी बँक, स्पर्धा परीक्षा व अन्य नोकरीचा पर्याय निवडत आहेत. अभियांत्रिकी पदवीच्या भरवशावर नोकरी मिळविणाऱ्यांची संख्याही कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी इकडे पाठ फिरवली. याचा परिणाम प्रवेशावर झाल्याने महाविद्यालयांनी जागा कमी करण्याचे ठरविले. यातूनच २०२०-२१ या वर्षापर्यंत अभियांत्रिकी शाखेतील सहा लाख ५५ हजार ३९६ जागा घटल्या आहेत. विशेष म्हणज, पाच वर्षांपूर्वी देशातील ३० लाखांवर असलेल्या जागा थेट २४ लाखांवर आलेल्या आहेत.




Kolhapur, Main
01/03/2021 Page No. 7

लोकमत



पेठ वडगाव पालिकेच्या स्वच्छ महाविद्यालय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस अशोकराव माने फार्मसी कॉलेजला मिळाले. मुख्याधिकारी सुषमा शिंदे (कोल्हे) यांच्या हस्ते संस्था अध्यक्ष विजयसिंह माने यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष मोहनलाल माळी, मनीषा माने, डॉ. एस. एस. पाटील उपस्थित होते.

# 'माने फार्मसी'ला स्वच्छ महाविद्यालयाचा मान

## वडगाव पालिकेच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** स्वच्छ सर्वेक्षणअंतर्गत वडगाव नगरपालिकेने घेतलेल्या स्पर्धेत अशोकराव माने फार्मसी कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. महाविद्यालय खुल्या गटात हे विजेतपद मिळविले. याचे बक्षीस नगरपालिकेच्या मुख्याधिकारी सुषमा शिंदे (कोल्हे) यांच्या हस्ते संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांना देण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष मोहनलाल माळी, जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने प्रमुख उपस्थित होते.

कॉलेजने परिसरात स्वछता निर्माण केली. ओला, सुका कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची उत्तम सोय निर्माण केली. [illegible] सोय उपलब्ध करून दिली. बाह्य व अंतर्गत स्वछता ठेवून नीटनेटकेपणा ठेवला. या सर्वांची दखल घेत परीक्षण करून नगरपालिकेने माने फार्मसी कॉलेजला प्रथम क्रमांक दिला, अशी माहिती प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील यांनी दिली.

फार्मसी कॉलेजने विविध उपक्रम सतत राबवून सामाजिक जबाबदारी पार पाडण्यात नेहमीच अग्रेसर राहण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांच्या आरोग्यविषयक काळजीसंदर्भात प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करून उत्तम कर्तव्य बजावत आहे. कॉलेजचे काम कौतुकास्पद आहे, असे मत यावेळी मुख्याधिकारी यांनी व्यक्त केले.

पदाधिकाऱ्यांची बैठक पत्रकार यंदा वरील पुरस्कारांची घोषणा यांची प्रमुख उप
तसेच आमदा

तरुण भारत



वाठार : विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत संस्थाध्यक्ष विजयसिंह माने, प्रभारी संचालक प्रा. प्रवीण घेवारी, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. डॉ. अजय मस्के, विभागप्रमुख प्रा. डॉ. हणमंत शेटे व सहकारी.

# माने ग्रुपच्या विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड

वार्ताहर

टोप

कोरोना काळातही विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करत अशोकराव माने ग्रुपने कौतुकास्पद कामगिरी केली आहे. टीसीएस, इन्फोसिस, कमिन्स, एमफासिस, ईन यंत्रा यासह अन्य नामांकित कंपन्यांमध्ये २०६ विद्यार्थ्यांची निवड झाली, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयात आयोजित केला होता.

आरएसबी ट्रान्समिशन (२८), टाटा मोटर्स (३१), ईन यंत्रा (२८), एआरएम (२४), पिआजिओ (११), जॉन डिअर (५०), एमफासिस (९), कमिन्स (५) अशा विविध कंपनीमध्ये २०६ विद्यार्थ्यांची निवड झाली. नुकतीच निवड झालेल्या आशिष मानकर (बायजू), सूर्यकांत सावंत (टीसीएस), अभिजीत चौगुले (इन्फोसिस), अक्षय घाटगे (एलआयसी) यांचा सत्कार करण्यात आला. ह विद्यार्थी मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स विभागातील आहेत. सत्कारावेळी संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने, जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने, प्रभारी संचालक प्रा. प्रवीण घेवारी, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. डॉ. अजय मस्के, विभागप्रमुख प्रा. डॉ. हणमंत शेटे व सहकारी उपस्थित होते.

# अशोकराव माने इन्स्टिट्यूटच्या २०६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनमधील २०६ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपनीत कॅम्पस मुलाखतीतून निवड झाली. कोरोनामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीतही माने इन्स्टिट्यूटने विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळवून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले आहेत, अशी माहिती संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

टीसीएस, इन्फोसिस, कमिन्स, एमफासीस, इन यंत्रा अशा विविध कंपन्यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून माने इन्स्टिट्यूटमधील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आशिष मानकर, अभिजीत चौगुले, सूर्यकांत सावंत, अक्षय बागणे यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांच्या हस्ते जिल्हा परिषद सदस्या मनीषा माने यांच्या उपस्थित आशिष मानकर (बायजू), सूर्यकांत सावंत (टीसीएस), अभिजीत चौगुले, अक्षय घाटगे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



**अशोकराव माने इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचा सत्कार विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रवीण घेवारी, हणमंत शेटे, अजय मस्के.**

इन्फोसिस टाटा मोटर्स २८, आरएसबी ट्रान्समिशन ३१, एलआयसीमध्ये २४, पिआजिओ ११, जॉन डीअर ५०, एमफासिस ९, कमिन्समध्ये १५ अशा विविध कंपन्यांमध्ये या विद्यार्थ्यांच्या निवडी झाल्या. यावेळी प्रभारी संचालक प्रवीण घेवारी, प्रा. अजय मस्के, प्रा. हणमंत शेटे उपस्थित होते.

लोकमत

# माने इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** वाठार (ता. हातकणंगले) येथील अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमधील २०६ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये कॅम्पस मुलाखतीतून निवड झाली आहे. कोरोनामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीतही माने इन्स्टिट्यूटने विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळवून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केल्याची माहिती संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

टीसीएस, इन्फोसिस, कमिन्स, एमफासिस, इन यंत्रा अशा विविध कंपन्यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून माने इन्स्टिट्यूटमधील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांची निवड केली. या कॅम्पस मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आशिष मानकर, अभिजीत चौगुले, सूर्यकांत सावंत, अक्षय बागणे यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. विजयसिंह माने यांच्या हस्ते व जिल्हा परिषद सदस्या मनिषा माने यांच्या उपस्थितीत या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभारी संचालक प्रवीण घेवारी, प्रा. अजय मस्के, प्रा. हणमंत शेटे आदी उपस्थित होते.



अशोकराव माने इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचा सत्कार विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रवीण घेवारी, हणमंत शेटे, अजय मस्के उपस्थित होते.

Kolhapur Main
Page No. 4 Jan 03, 2021
Powered by: erelego.com

लोकमत



वाठार येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकचा विद्यार्थी राजवर्धन दबडे याने जुन्या बुलेटपासून सुपर बाईक बनवली. याबद्दल प्राचार्य वाय. आर. गुरव यांनी त्याचा सत्कार केला. यावेळी प्राध्यापक उपस्थित होते.

# माने पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्याने बुलेटला बनवली क्रूझर बाइक

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** जुन्या बुलेटमध्ये विविध बदल करून त्याला सूपर बाईकचा लूक देत तिचे क्रूझर बाइकमध्ये रूपांतर करण्याची किमया वाठार येथील अशोकराव माने पॉलिटेक्निकचा विद्यार्थी राजवर्धन दबडे यांनी केली आहे. स्पोर्ट्स बाइक असल्याने तिला पाहण्यासाठी व टेस्ट ड्राइव्हसाठी तरुणांची गर्दी होत आहे.

राजवर्धन दबडे ऑटोमोबाइल इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षाच्या वर्गात शिकत आहे. कॉलेजमध्ये घेत असलेल्या ज्ञानाचा वापर करीत त्याने बुलेट मॉडीफाय करण्याचा निश्चय केला. त्यासाठी १९८२ मधील ३५० सीसीची जुनी बुलेट घेतली. तीन महिन्यांत त्याने तिचे रूपच बदलले. इंजिनची क्षमता वाढवून ५०० सीसी केली. मोठा कार्बोरेटर घालून हाय गीअर बॉक्स बसविला. आरपीएमचा रेशीओ वाढविला. इंजिन हेड बदलले. बसण्याची व्यवस्था बदलून एकच सीट ठेवली. ग्रीप घेणारे मोठे टायर बसविले. टाकीचा आकार चपटा करून क्षमता १७ लिटर केली. अशा प्रकारे पूर्णतः बदल करून डबल फायरिंग असणारी बुलेट बनविली. यासाठी प्राचार्य वाय. आर. गुरव, प्रा. पी. टी. हसबे यांचे मार्गदर्शन मिळाले.

पुढारी

# पेठवडगावच्या माने फार्मसीच्या अकरा विद्यार्थ्यांचे जीपॅट परीक्षेत उज्ज्वल यश

**पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या जीपॅट परीक्षेत येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या अकरा विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले. शिवाजी विद्यापीठअंतर्गत येणाऱ्या फार्मसी कॉलेजमध्ये उच्च गुणवत्ता राखत लक्षवेधी यश मिळविण्याचा मान या कॉलेजने पटकावला आहे.

औषध निर्माणशास्त्र क्षेत्रात देश पातळीवर या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या फारच कमी असते. अशा परिस्थितीत माने फार्मसी कॉलेजने मात्र दर्जेदार व गुणवत्तेच्या जोरावर अत्युच्च यशाला गवसणी घातली आहे. तब्बल अकरा विद्यार्थी सर्वोत्तम गुणांनी उत्तीर्ण होणारे हे अपवादात्मक कॉलेज ठरले आहे.

विद्यार्थ्यांच्यासर्वांगीणप्रगतीसाठी कॉलेजच्या वतीने अद्ययावत शिक्षण देण्याची व्यवस्था कायमच करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, कठोर परिश्रम व त्यांना मिळालेले योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाले आहे. यापुढेही गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबवून गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची महिती संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांनी दिली.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये निखिल माने, राजेंद्र मालेगावे, ऋतुजा बुगड, कोमल पवार, व्यंकटेश मुंडे, प्रदीप गावेकर, विजया गोवंदे, प्रेरणा तेली, श्रुती कुलकर्णी, जस्मिन नायकवडी, शुभांगी चौगुले तसेच सावे येथील अशोकराव माने इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च कॉलेजचा विद्यार्थी कौस्तुभ सुतार यांचा समावेश आहे.

या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थाध्यक्ष विजयसिंह माने प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. ए. एस. कुलकर्णी, डॉ. एस. एम. गेंजगे, प्रा. पी. बी. पाटील, प्रा. एस. ए. बंडगर उपस्थित होते



**पेठवडगाव : येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. एस. व्ही. पाटील, ए. एस. कुलकर्णी, पी. बी. पाटील, एस. ए. बंडगर उपस्थित होते.**

खेळते भांडवल २४५... ...गरिकांची लोकसंख्या

तरुणभारत



टोप : जीपॅट २०२१ परीक्षेत यशस्वीतांसमवेत संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने, प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. ए. एस. कुलकर्णी, स. प्रा. एस. ए. बंडगर, प्रा. पी. बी. पाटील.

# माने फार्मसी कॉलेजचे जीपॅट परीक्षेत यश

वार्ताहर

टोप

पेठवडगाव येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीच्या ११ विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्यावतीने घेतलेल्या जीपॅट परीक्षेत यश संपादन केले. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे कॉलेजच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांची नावे – निखिल माने (२५२), आदर्श मालगावे (२१९), ऋतुजा बुगड (२११), कोमल पवार (२०१), वेंकटेश मुंडे (१९१), प्रदीप गावकर (१७६), विजया गोवंडे (१७०), प्रेरणा तेली (१६०), श्रुती कुलकर्णी (१६०), जस्मिन नायकवडी (१५७), शुभांगी चौगुले (१३६), कौस्तुभ सुतार (१६४).

संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अद्यावत व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी अग्रेसर आहे. विद्यार्थ्यांनी जिद्द, कठोर परिश्रमातून मिळविलेले यश हे कौतुकास्पद आहे.

यशस्वीतांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह माने यांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. ए. एस. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. जीपॅट विभाग प्रमुख डॉ. एस. एम. गेजगे, स. प्रा. पी. बी. पाटील, जिल्हा परिषद सदस्या मनिषा माने यांचे मार्गदर्शन लाभले.